१२९

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नाशिक ग्रामीण **P.S.(ठाणे):** पेठ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0050 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/03/2025 06:16

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 20/03/2025

**Date To ( दिनांक पर्यंत):** 21/03/2025

**Time From (वेळेपासून):** 10:57 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 05:29 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 21/03/2025 **Time (वेळ):** 05:29 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/03/2025 05:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 08 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पेठ बलसाड रोड RTO चेक पोस्ट राजबारी ,पेठ जि नाशिक

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संभाजी बाळासोब निकम

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** बाळासोब निकम

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1996

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गव्हाली, पोस्ट औराळा,कन्नड,छत्रपती संभाजीनगर,कन्नड ग्रामीण,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गव्हाली, पोस्ट औराळा,कन्नड,छत्रपती संभाजीनगर,कन्नड ग्रामीण,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9922066448

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विनोद अर्जुन साळवे | | | 1. फलट नं10,इन्फीनीटी हाईट्स सोमेश्वर,नाशिक,नाशिक,गंगापूर, नाशिक शहर,महाराष्ट्र,भारत-422222 |
| 2 | नितीन भिकनराव अहिरे | | वडील का नाम : भिकनराव अहिरे | 1. घर नं59/6,सौभाग्य नगर, मानसा बंगला, गंगापुर रोड, पं, नाशिक,नाशिक,गंगापूर,नाशिक शहर,महाराष्ट्र,भारत-422013 |



Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | मनोहर सुनिल निकम | | वडील का नाम : सुनिल निकम | 1. विरोबा मंदिर,माळा वरती, कुकाणे,मालेगाव,वडनेर खाकुर्डी ,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 21/03/2025

मी संभाजी बाळासोब निकम, वय-29 वर्ष, व्यवसाय - सामाजीक कार्य व शेती, रा.गव्हाली, पोस्ट औराळा, ता. कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर मो.क्र.9922066448, 8975947171. समक्ष फिर्याद देतो की,मी दिनांक 20/03/2025रोजी समक्ष हॉटेल सिटी स्पाईस दिंडोरी रोड, नाशिक येथे हजर राहुन लाचमागणीची तक्रार दिली की,

मी सामाजीक कामे करीता असतांना बऱ्याच वेळा गरिब लोकां करीता सहलीचे आयोजन करीत असतो त्या करीता मी महाराष्ट्रा बाहेर देखील सहलीचे नियोजन करीत असतो. परंतु महाराष्ट्रा बाहेर जात असतांना राजबरी येथे आर.टी. ओ.चेक पोस्ट असुन त्या ठिकाणी आर.टी.ओ.अधिकारी मार्फत लाचेची मागणी केली जाते, लाच न दिल्यासगुजरात मध्ये प्रवेश नाकारला जातो. त्यामुळे बरेच अंतर पार करुन दुसऱ्या मार्गाने जावे लागते, यामुळे माझे व माझ्या सोबत असणाऱ्या लोकांचे नुकसान होत आहे. या अधि एक ते दोन महिण्यांपुर्वी असा मला त्रास झाला होता. तुम्हाला चेक पोस्ट पार करायची असेल तर प्रत्येक वेळी पाच हजार रुपये दयावे लागतील म्हणुन आर.टी.ओ. नि. लाचेची मागणी केलेली आहे.

मी दिनांक 20/03/2025 रोजी त्याच मार्गाने जाणार आहे. त्यावेळी डयुटीवर असणारे आर.टी.ओ. इन्स्पॅक्टर मला खात्रीशिर रित्या लाच मागणी करणार आहे. त्यांनी स्वत: अथवा दुसऱ्या इसमा कडुनलाच मागणी करुन स्विकारल्यास त्यांवर कार्यवाही करावी हि माझी विनंती आहे.

माझी आर.टी.ओ. इन्स्पॅक्टरयांना लाच देण्याची इच्छा नाही. त्यांच्याशी माझा काहीएक देण्याघेण्याचा उसनवारीचा व्यवहार नाही. तसेच त्यांच्याशी माझी वैर अगर दुशमनी नाही. त्यांना पकडुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी ही नंम्र विनंती आहे.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.दिलीप साबळे यांनी मी दिलेली तक्रार उपस्थित असलेले त्यांच्या सोबतचे दोन शासकीय पंचास वाचण्यास दिली पंचानी ती तक्रार वाचल्यानंतर त्यावर पंचानी सहया केल्या व पोलीस उप अधिक्षक दिलीप साबळे यांनी समक्ष म्हणुन सही केली.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.दिलीप साबळे यांनी मी दिलेल्या लाच मागणीचे तक्रारीचे अनुषंगाने प्रथम लाचमागणी पडताळणी करण्याचा व लाचेची मागणी झाल्यास त्याच वेळी लाचरक्कम देऊन सापळा कारवाई करण्याचा निर्णय माझे व पंचांचे संमतीने घेतला. त्या प्रमाणे लाचमागणी पडताळणी व सापळा कारवाई संदर्भात त्यांनी मला व पंचास तसेच पथकातील सदस्यांना आवश्यक सुचना दिल्या. तसेच सदर लाचमागणी पडताळणीमध्ये डिजीटल व्हाईस रेकॅार्डरचा व लाच रक्कमेस अँथ्रासिन पावडरचा वापर करण्यात येणार असल्याचे मला सांगीतले .



Scanned with OKEN Scanner

मी दिनांक20/03/2025 रोजी छत्रपती संभाजीनगर येथुन नाशिक पेठ मार्गेगुजरात राज्य येथे साई बाबा खाजगी ट्रॅव्हल्स क्र.MH 20 EL 8892 या बसने 22 लोकांना सहली करीता घेऊन जाणार असल्याने मी, दोन्ही पंच, पोलीस उप अधीक्षक दिलीप साबळे, सापळा पथकातील दोन सदस्य व सहली मधील व्यक्ती असे नमुद बस मध्ये नाशिक येथुन गुजरात च्या दिशेने 19.40 वा रवाना झालो तसेच आमचे पाठोपाठ पो.नि.कोरे, पो.ह.जोशि हेखाजगी वाहनाने रवाना झाले.त्यानंतर आम्ही राजबरी येथील पेठ आर.टी.ओ. चेक पॉइंटचे आलीकडे काही अंतरावर पोहोचल्या नंतर पोउप अधी दिलीप साबळे यांनी 21.47 वा. व्हॅाईस रेकॉर्डर सुरु Ûú¹®Ö माझ्या गळयात अडकवुन दिले व अँथ्रासिन पावडर लावलेल्या 5000 रु. लाचेची रक्कम माझ्या कडे दिली. थोडयाच वेळात आम्ही खाजगी ट्रॅव्हल्सने पेठ येथील राजबरी गावाजवळील पेठ आर.टी.ओ.चेक पॉइंट येथे पोहोचलो तेथे चालक यांनी गाडी थांबविल्या नंतर मी व पंच श्री.खडसे असे ट्रॅव्हल्स खाली उतरुन आर.टी.ओ. चेक पॉइंट कार्यालयकडे गेलो तेथे समोर एक व्यक्ती हातामध्ये मोठी बॅटरी (टॉर्च) घेऊन बसलेले होते मी व पंच असे त्यांचे समोर गेलो असता ते पंचाना उद्देशुन बोलले की, तम्ही बसा गाडीत, एका जनाचच काम आहे, दोन जनाचे काय काम असे म्हणाले म्हणुन पंच हेथोडया अंतरावर जाऊन थांबले व मी चेकपोस्ट मधील चलन भरणा करण्याचे खिडकी समोर गेलो सदर खिडकी पलीकडे बसलेले व्यक्तीस नमस्कार केला व म्हणालो की अंकलेश्वर ला चाललो गुजरात ला, त्यावर समोरील व्यक्तीने मला विचारले की, कुठुन आले त्यावर मी म्हणालो कन्नड संभाजीनगर असे बोललो त्यानंतर मीसदर ट्रॅव्हल्सचे कागदपत्रे सदर व्यक्तीस दाखवली व सदर कागदपत्रे पाहुन सदर व्यक्ती मला बोलले की, पावती घेऊन जा, त्यावर मी त्यांना म्हणालो की, कमी अधिक करा ना काही, त्यावर समोरील व्यक्ती म्हणाला की, ड्रायव्हर कुठे आहे त्यानंतर मी ड्रायव्हर यांना सदर ठिकाणी बोलावुन सदर व्यक्तीची भेट करुन दिली त्यावेळी सदर व्यक्ती हे ड्रायव्हर ला काही न बोलता मला म्हणाले की पावती तुम्हाला कामात येईल व तिकुन येतानाही पावती तुम्हाला कामात येईल असे म्हणाले व सगळ होईल त्यात दोन हजार मध्ये , बाहेरच्या कडुन चारहजार घेतो असे म्हणाले त्यावर मी त्यांना चार हजाराची देता असे विचारले त्यावर त्यांनी मला विचारले की, ट्रिप हेका, त्यावर मी त्यांना ट्रिप हेना आमची असे बोललो व घ्या करुन काही कमी अधिक सिपी कशाला फाडता असे म्हणालो. त्यानंतर सदर खिडकी पलीकडे बसलेले एक इसम यांनी मला माझे नाव विचारले त्यांना मी माझे नाव सांगीतल्या नंतरत्यांचे नाव विचारले असता त्यांनीत्यांचे नाव अहीरे असेसांगीतले. त्यांनंतर खिडकीतील आधी बसलेले व्यक्तींनी मला हाताचे पंजाचे पाच बोटे दाखवुन इशाराकेला त्यावर मी कितीहं, विचारले त्यावर सदर व्यक्ती पाचशे , पाचशे असे म्हणाले त्यावर मी पन्नास म्हणताका पाचशे असे , मला वाटलं पन्नास हजार त्यावर सदर व्यक्ती मला म्हणालेकी, पावती दोनहजारची दिलीतर... असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना माझ्या खिशातील ऍ्थ्रासिनपावडर लावलेल्या रक्कमेतील 500/- रुपयांची एक नोट काढुन सदर व्यक्तीस दिली असता सदर व्यक्तीने सदर रक्कम त्यांचेहाताने स्विकारुन त्यांचे समोरील टेबलचे ड्रॉवरमध्येठेऊन घेतली. त्यानंतर मीसदरखीडकीचे बाजुस येऊनसापळा पथकास दिसेल अशा रितीने लाच स्विकारले बाबत पुर्व नियोजीत इशारा केला. ती वेळ 21.57 वा.ची होती त्यावर लागलीच सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी पंच क्र.2 असे सदर घटनास्थळी आले.

त्यानंतर सापळा पथकाने सदर लाचेची रक्कम स्विकारलेली व्यक्ती, त्यांचे बाजुस बसलेले अहिरे व कार्यालया बाहेर बॅटरी घेऊन बसलेले इसम यांना ताब्यात घेतले व त्यांना त्यांचेनाव गाव विचारले असता खिडकी वरील इसम यांनीत्यांचे नाव विनोद अर्जुन साळवे वय-47 वर्ष, व्यवसाय-चालक, (खाजगी इसम) रा.फलॅट नं.102, इन्फीनीटी हाईट्स, सोमेश्वर, नाशिक, आहीरे यांनीत्यांचे नाव नितीन भिकनराव अहिरे वय-49 वर्ष, व्यवसाय नौकरीपद मोटार वाहन निरीक्षक, प्रादेशिक परिवहन विभाग, नाशिक रा.घर नं.59/60, सौभाग्य नगर, मानसा बंगला, गंगापुर रोड, पंपिंग स्टेशन, नाशिक व कार्यालया बाहेर असलेले व्यक्ती यांनी त्यांचे नाव मनोहर सुनिल निकम, वय-27 वर्ष, खाजगी इसम, रा. विरोबा मंदिर, माळा वरती, कुकाणे, ता.मालेगाव, जि.नाशिक असे सांगीतले. त्यानंतर श्री.बिनोद साळवेयांनी स्विकारुन त्यांचे समोरील टेबलचे ड्रॉवर मध्ये ठेवलेली लाचेची रक्कम 500/-रुपये पंचक्र.2 श्री.बनकर यांनी हस्तगत केली व सापळा पुर्व कारवाईचे वेळी लिहीलेले नोटांचे क्रमांक व ताब्यात घेतलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटेचे क्रमांक तपासुन पाहीले असता सदर नोट 2HS 369628 क्रमांकाची असुन सदर नोट सापळा कारवाई पुर्वी अँथ्रासिन पावडर लावलेल्या नोटां पैकी असल्याची सापळा पथकाची खात्री झाली. करीता दिनांक 20/03/2025 रोजी लाचमागणी पडताळणी, सापळा कारवाई दरम्यान खाजगी इसम विनोद अर्जुन साळवे यांनी पेठ आर.टी.ओ चेक पॉईंट कार्यालयामध्ये 21.57 वा आलोसे नितीन भिकनराव अहिरे, मोटार वाहन निरीक्षक, यांचेसमक्ष व त्यांच्या प्रोत्साहनपर संमतीने मी आयोजित केलेल्या सहलीचे वाहन परराज्यात (गुजरात मध्ये) प्रवेश करण्यासाठी तडजोड रक्कमेच्या (Compound Fees) ई चलनासाठी दोनहजार रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 500/- रुपये लाच रक्कम स्विकारली तसेच कार्यालया बाहेरील खाजगी इसम मनोहर निकम यांनी

Scanned with OKEN Scanner

आरोपी विनोद साळवे यांना लाच घेणे सुकर व्हावे म्हणुन माझ्या सोबत असलेले पंच यांना पेठ आर.टी.ओ.चेक पाईंट कार्यालयात जाण्यास अटकाव करुन वरील आरोपी यांना गुन्हयात सहाय्य केले म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टंकलीखीत केली असुन ती मी वाचुन पाहीली बरोबर व खरी आहे.

समक्ष हि फिर्याद दिली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
DWARKANATH MAHADU GONDKE(I (Inspector)) / PORN61936 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

ASI
[redacted]

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

प्रत मीळाली
दि. 29/3/2024
06:54
ASI
[redacted]



Scanned with OKEN Scanner